**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. ३ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** उत्तम धर्मा खाडे

**वय:** ४५ वर्षे, **व्यवसाय:** पो. ह. ब. नं. २३४

**सध्या नेमणूक:** वालचंदनगर पोलीस स्टेशन

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु</u>**

दिनांक ०३/०४/२०२३ रोजी मी वालचंदनगर पोलीस ठाणे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी ठाणे अंमलदार यांनी गु.र.नं. १५५/२०२३ नोंद करून सदर गुन्हयाचा तपास तोंडी आदेशाने माझेकडे सोपविला. तपासाच्या अनुषंगाने दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. २२ वर आहे. मयत व्यक्तीचा मरणोत्तर पंचनामा प्राप्त केला. दिनांक ०८/०४/२०२३ रोजी अपघातग्रस्त वाहनांचा दोन पंचासमक्ष दिसते परिस्थितीचा पंचनामा केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते. आर.टी.ओ ने केलेल्या वाहनांच्या तपासणीचे प्रमाणपत्र प्राप्त करून गुन्हया कामी दाखल केले. पाच साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. जप्त केलेली वाहने ताबा पावतीने वाहन मालकास परत केली. आता मला दिनांक १७/०४/२०२३ रोजीची वाहनाची ताबा पावती दाखविण्यात आली. ती तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येते. तपासांअती आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. आर. आर. बनसोडे यांचे मार्फत शपथेवर सुरू</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, कथित घटना प्रत्यक्ष पाहिलेली व्यक्ती मला मिळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद व तपासटिपणामध्ये प्रस्तुत आरोपीविरूध्द कोणतिही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न मिळून आल्याने कथित घटना कोणाच्या चुकीमुळे झाली व कोणत्या वाहनाने झाली हे मी निश्चित सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी पोलीस ठाणे येथेच केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०४/२०२३ रोजी

केलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार तसेच फिर्यादी मला सदर दिवशी भेटले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा घटनास्थळ पंचनामा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वाहनाचा दिसते परिस्थितीचा पंचनामा खोटा व चुकीचा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तपासामध्ये सदर आरोपीने कोणताही गुन्हा केला नाही असे निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांची तपासटिपणे त्यांच्या सांगणेप्रमाणे नोंदविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र प्रस्तुत आरोपीविरूध्द दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक २१/०८/२०२५